**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय,**
दुरध्वनी क्र. २६१२९३२१/२६१२२८४६

---

जा.क्र. पतसंस्था/स.आ-५/ खर्च/ वसूलीआदेश/२०१८/872 दिनांक ०६/०४ /२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश.**

**वाचले-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७.

**वाचावे-**

१. RCR/Surcharge/७६ दिनांक १५/७/७६.
२. जा.क्र. वसूली/डी-१/सरचार्ज/१५६/सन ८३ दिनांक १० मार्च १९८३.
३. अ.शा.वसूली/बी-१/सरचार्ज/१५६/८३ दिनांक ३/८/१९८३.
४. जा.क्र. वसूली/बी-१/अधिकार/विनियोग/८५ दिनांक १८/७/१९८५.
५. जा.क्र. वसूली/बी-१/सरचार्ज/८५ दिनांक ६/११/१९८५.
६. जा.क्र. वसूली /बी-४/विवअ/ना.बँका/सरचार्ज ९२ दिनांक २७/२/१९९२.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ नुसार, अ)संस्थेने मिळविलेल्या दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम, ब) निबंधक, किंवा परिसमापक यांचा निर्णय, निवाडा किंवा आदेश याअन्वये येणे असलेली कोणतीही रक्कम, क) या अधिनियमान्वये खर्च म्हणून निवाडयाने दिलेली रक्कम, ड) संस्थेच्या मत्तेस अंशदान म्हणून या अधिनियमान्वये जी रक्कम देण्यासाठी आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही रक्कम इ) कलम १०१ च्या पोटकलम (१) किंवा (२) अन्वये किंवा कलम १३७ च्या पोटकलम (१) अन्वये निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार येणे असलेली कोणतीही रक्कम आणि अशा रकमेवर किंवा एकूण रकमेवर कोणतेही व्याज देय असल्यास असे व्याज आणि निबंधकाने वेळोवेळी घालून दिलेल्या फी च्या प्रमाणानुसारचा आदेशिकेचा खर्च(cost of process) ज्या व्यक्ती विरुध्द असा हुकूमनामा , निर्णय, निवाडा किंवा आदेश मिळवण्यात किंवा देण्यात आला असेल अशा व्यक्तीच्या मालमत्तेवर जप्ती आणून, तिची विक्री करुन किंवा जप्ती शिवाय तिची विक्री करुन वसूल करता येईल.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (२) अनुसार वसूलीच्या कारवाईच्या खर्चाचे प्रमाण वेळोवेळी सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाव्दारे, निबंधकाकडून निश्चित करण्यात येईल.

उपरोक्त नमूद तरतुदीनुसार थकबाकीदाराकडून हुकूमनाम्याच्या/वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) निश्चित करावयाचे अधिकार निबंधकास आहेत.

**-आदेश-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी डॉ. विजय झाडे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे खाली नमूद प्रमाणे वसूली अधिकारी यांनी वसूल करावयाच्या हुकूमनाम्याच्या/वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | वसूलीचे टप्पे | आदेशिकेचा खर्च |
|---|---|---|
| १ | वसूली दाखला/ हुकुमनामा प्राप्त झाल्यानंतर आणि मागणी नोटीस दिल्यानंतर जप्ती नोटीस देण्यापूर्वी | एकूण वसूलपात्र रकमेच्या ०.५०% |
| २ | जप्ती नोटीस दिल्यानंतर व जप्ती केल्यानंतर | एकूण वसूलपात्र रकमेच्या ०.७५% |
| ३ | लिलाव जाहिरकरुन जंगम/स्थावर मालमत्तेच्या लिलावास मान्यता मिळाल्यानंतर | एकूण वसूलपात्र रकमेच्या १.५०% |

**अटी व शर्ती-**

**१.**वसूली अधिकारी यांना हुकूमनामा/वसूली दाखला यामधील वसूलपात्र रक्कम व उपरोक्त नमूद हुकूमनाम्याच्या/वसूली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (cost of process) **या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसूली खर्च म्हणून थकबाकीदाराकडून वसूल करता येणार नाही.**

**२.** लिलावाव्दारे मालमत्ता विक्री केल्यानंतर **कमाल १.५०%** दरानेच आदेशिकेचा खर्च वसूल करता येईल. अन्यथा उपरोक्त नमुद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसूल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

**३.** उपरोक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसूली संस्थेस एका कर्जदाराकडून **जास्तीत जास्त रक्कम रु. १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसूल करता येईल**.

४.उपरोक्त अट क्र. १ व ३ मध्ये नमूद केलेल्या रकमे व्यतिरिक्त वसूली अधिकारी यांनी जादा रक्कम वसूल केल्यास ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

**५.** प्रस्तुत खर्चाचा वापर वसूली अधिकारी/संस्था यांनी वसूली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी, जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. **या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.**

**६.** संस्थेने याप्रमाणे वसूल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरण निहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण करताना खर्चाची आकारणी व त्याचा विनियोग योग्य पध्दतीने केला आहे किंवा नाही याबाबत तपासणी करुन त्याबाबतचे निष्कर्ष

लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. लेखापरीक्षण अहवालामध्ये याबाबत गंभीर दोष निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेच्या निबंधकाने आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावयाची आहे.

७.सहकार आयुक्त कार्यालयाने सरचार्जसंबंधी उपरोक्त संदर्भ क्र १ ते ६ मध्ये नमूद केलेली वा यासंबंधीची अन्य परिपत्रके/आदेश या आदेशाचे दिनांकापासून अधिक्रमित/रदद करणेत येत आहेत.

८.सदरचे आदेश या आदेशाचे दिनांकापासून तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

(डॉ. विजय झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना सदरच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत अवगत करावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.

२.मा.राज्य मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव मुंबई-३२.

३.मा. अतिरिक्त मुख्य सचिव, (सहकार) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई-३२.

प्रत-

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.

२. अपर निबंधक सहकारी संस्था, (पतसंस्था/प्रशासन/सर्वसाधारण) महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत उचित कार्यवाहीस्तव-

१.महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. मुंबई लकाकी बंगल्या शेजारी लकाकी रोड, मॉडेल कॉलनी शिवाजी नगर पुणे-१६.

२.महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशन / बँक असोशिएशन भारतीय क्रिडा मंदिर नायगांव मुंबई-३१

प्रत- सहकार खात्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी-

सर्वसाधारण शाखा मुख्यालय पुणे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.